पोलीस निरीक्षक, समर्थ पोलीस स्टेशन
पुणे

गुडवर्क प्रेसनोट - १

समर्थ पोलीस ठाणे पुणे

दिनांक १४/४/ २०१९

**जमीन व्यवहारात एक कोटी बारा लाख रुपयांची फसवणुक प्रकरणात हवा असलेला आरोपी पोलीसांच्या ताब्यात .**

दि.३०/१२/२०१५ ते दि.३०/१/२०१८ दरम्यानचे मौजे शिरसवाडी , वाडे बोल्हाई येथील गट नं. ८० व ८२ मधील शेत जमीन ही नावावर नसताना ती नावावर असल्याचे दर्शविणारा खोटा व बनावट ७/१२ उतारा मनीष व संदीप रमेश चावडा आणि पूनम व महेश सोळंकी यांनी तयार करुन तो खरा आहे असे खरेदीदार श्री. प्रविण जगताप रा. कुमार पार्क , बिबवेवाडी कोंढवा रोड पुणे यांना भासवून सदर गटातील ५१३ आर पैकी ३४८ आर जमीनीचे खरेदीपोटी रु.१ कोटी १२ लाख ची रक्कम स्विकारुन १७१ आर जागा ही देखील नावावर करुन देतो असे आश्वासन देऊन खरेदी व्यवहाराचे अनुषंगाने श्री. प्रविण जगताप यांना दुय्यम निबंधक हवेली क्र. २२ कर्वेनगर , कोथरुड पुणे येथे नोंदणीकृत दस्त करुन दिला. अशा प्रकारे फसवणुक केली म्हणून श्री. प्रविण जगताप यांनी त्यांचे विरोधोत तक्रार दिल्याने मार्केटयार्ड पोलीस स्टेशन गुरनं. ११०/२०१८ भादवि.४२०,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

यानंतर आरोपी मनीष रमेश चावडा , संदीप रमेश चावडा व इतर हे आपली अटक टाळणेसाठी व फिर्यादी प्रविण गायकवाड यांचे पैसे परत करावे लागतील म्हणून लपून छपून रहात होते. यातील आरोपी मनीष रमेश चावडा रा.२६९ रास्तापेठ पुणे हा हॉटेल सुंदर समोर रहात असलेची गुप्त माहिती समर्थ पोलीस ठाण्याचे पोशि.निलेश साबळे यांना मिळाली होती. त्यांनी सदर बातमी श्री. बाळकृष्ण कदम , वरिष्ठ पोलीस निरीक्षक , समर्थ पोस्टे यांना कळविली . त्यांनी दिले मार्गदर्शनानुसार दिनांक १४/४/२०१९ रोजी सकाळी ११-०० वा. पोउपनि. प्रभाकर कापुरे , पोउपनि. नितीन अतकरे ,पोना .संदीप शिंदे व तपासपथकातील त्यांचे सहकारी यांचेसह सुदंर लॉज परिसरात सापळा लावला होता. मिळालेले बातमीनुसार ११-३० वा. चे सुमारास मनीष चावडा हा सुंदर लॉज समोर रोडवर आला . मिळालेले बातमीनुसार खात्री होताच समर्थ पोस्टे चे पोलीसांनी त्यास झडप टाकून पकडले . त्यास नांव पत्ता विचारता वरील प्रमाणे सांगितले.त्यास मार्केटयार्ड पोस्टे येथे शिरसवाडी , वाडेबोल्हाई येथील जमीन प्रकरणी श्री. प्रविण जगताप यांनी दिलेले तक्रारीबाबत विचारणा करता त्याने केलेले कृत्याची कबुली दिली . त्यास ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी मार्केटयार्ड पोलीसांकडे सुपूर्त केला आहे.. पोउपनि. श्री. महाले , मार्केट यार्ड पोस्टे हे पुढील तपास कार्यवाही करीत आहेत.